| RNI No. MAHMAR/2020/79677 | ISSN NO. - 2582-9971 | EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE | www.bharatsangram.com

शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६ ♦♦♦♦ वाशिम

पृष्ठे ४ | अंक 1७६ | वर्ष ७ | किंमत ४

# दैनिक भारत संग्राम

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

आजचे हवामान — बुलडाणा — कमाल 27°C — किमान 23°C

## थोडक्यात

### तरुणावर हल्ला

भारत संग्राम | प्रतिनिधी

**दारव्हा:** दुचाकीला कट मारल्याचा जाब विचारल्यावरून दोन तरुणांनी एका युवकावर लोखंडी टॉमीने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना लाख खिंड शिवारात घडली। रोहन संजय उके (वय २२, रा. पंचशील नगर, दारव्हा) याने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी हरीश प्रकाश चव्हाण (२९) व रुपेश पवार (२८, दोघे रा. लाख खिंड) यांनी दुचाकीला कट मारला। याबाबत विचारणा केली असता आरोपींनी शिवीगाळ करत टॉमीने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली। या प्रकरणी दारव्हा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे।

### पुसद येथून दोन दुचाकींची चोरी

भारत संग्राम | प्रतिनिधी

**यवतमाळ:** दारव्हा व पुसद शहरातून अज्ञात चोरट्यांनी दोन दुचाकी लंपास केल्याच्या घटना समोर आल्या आहेत। पहिल्या घटनेत दारव्हा येथील शासकीय रुग्णालयातील वॉटर फिल्टरजवळ उभी केलेली अरुण विठ्ठल राऊत (रा. शेंद्री डोल्हारी) यांची २५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल (क्र. MH 29 BT 4939) अज्ञात चोरट्याने पळवून नेली। तर दुसऱ्या घटनेत, पुसद येथील नाईक चौकातून उत्तम गणेश चिभडे यांची ५५ हजार रुपये किमतीची स्प्लेंडर प्लस दुचाकी (क्र. MH 29 CN 1126) चोरीला गेली। दोन्ही प्रकरणांत पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवला आहे।

### विरोध केल्याने दांडका मारला

भारत संग्राम | प्रतिनिधी

**महागाव:** घरासमोर दारू पिऊन गोंधळ घालण्यास मज्जाव केल्याच्या कारणावरून तिघांनी एका प्रौढावर लाकडी दांडक्याने हल्ला केल्याची घटना तिवरंग येथे घडली। रणजित पंडित दामोदर (वय ४०) यांनी आरोपी माधव भोंदू राठोड याला घरासमोर गोंधळ न घालण्याबाबत समजावून सांगितले होते। याचा राग येऊन माधव राठोड, जयपाल राठोड आणि भोजराज राठोड यांनी संगनमत करून रणजित यांच्या डोक्यात लाकडी दांडका मारून गंभीर जखमी केले तसेच मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली। महागाव पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे।

### धारदार वस्तूने वार

भारत संग्राम | प्रतिनिधी

**राळेगाव:** जुन्या वैमनस्यातून एका व्यक्तीवर भाल्यासारख्या धारदार वस्तूने हल्ला करून डोळ्याजवळ गंभीर इजा केल्याची घटना वडकी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरद येथे घडली। पुरुषोत्तम किसनाजी दुधकोहळे (वय ५५, रा. वरद) यांच्यावर गजानन मधुकर नेहारे (वय ३५) याने जुन्या वादातून प्राणघातक हल्ला चढवला। यात दुधकोहळे यांच्या डाव्या डोळ्याच्या वर गंभीर दुखापत झाली

### बोरगाव पुंजी शिवारातून विहिरीवरील विद्युत मोटार चोरीला

भारत संग्राम | प्रतिनिधी

**घाटंजी :** बोरगाव पुंजी शेतशिवारातील एका विहिरीवर बसवलेली पाण्याची विद्युत मोटार अज्ञात चोरट्याने लंपास केली. बोरगाव पुंजी (ता. आर्णी) येथील रवींद्र नारायण जयसिंगपुरे (वय ५२) यांनी पिकांना पाणी देण्यासाठी विहिरीवर २८ हजार रुपये किमतीची 'इकोझेन' कंपनीची मोटार बसवली होती. अज्ञात चोरट्याने ती विहिरीवरून काढून नेली. जयसिंगपुरे यांच्या तक्रारीवरून घाटंजी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# निकषांची वाट न पाहता दुष्काळ जाहीर करा!

## शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार द्या; शरद पवारांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात पावसाने प्रदीर्घ काळ ओढ दिल्याने निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी संकटाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र लिहून तातडीच्या उपाययोजनांची आग्रही मागणी केली आहे. "शासनाने औपचारिक निकषांची वाट न पाहता गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांमध्ये त्वरित दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी किमान 50 हजार रुपयांची थेट आर्थिक मदत द्यावी आणि शेतमजुरांच्या खात्यात 25 हजार रुपये जमा करावेत," अशा प्रमुख मागण्या पवारांनी या पत्राद्वारे केल्या आहेत. राज्यातील विविध शेतकरी संघटनांकडूनही दुष्काळ जाहीर करण्याच्या मागण्या जोर धरत असताना शरद पवारांच्या या पत्रामुळे सरकारवरील दबाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात शरद पवार यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील विदारक



वास्तव मांडले आहे. "यंदा मान्सूनने मोठ्या प्रमाणावर पाठ फिरवल्यामुळे सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग आणि उडीद ही सर्वच खरीप पिके वाळून करपून गेली आहेत. पावसाअभावी उर्वरित पिकांवर कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून, उत्पादन खर्चही निघणे अशक्य झाले आहे. शेतीसोबतच पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचला असून ग्रामीण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होण्याची भीती निर्माण झाली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासकीय नियमांच्या तांत्रिक निकषांची व 5 ऑक्टोबरच्या औपचारिकतेची प्रतीक्षा न करता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करावा. बाधित तालुक्यांना दुष्काळसदृश घोषित करून सर्व दुष्काळी सवलती तत्काळ लागू कराव्यात. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात हेक्टरी किमान 50,000 रुपयांची मदत जमा करावी. तसेच शेतीकामे ठप्प झाल्याने रोजगारापासून वंचित राहिलेल्या शेतमजूर कुटुंबांना प्रत्येकी 25,000 रुपयांची विशेष आर्थिक मदत द्यावी. संकटात सापडलेल्या बळीराजाला दिलासा देण्यासाठी सर्वंकष कर्जमाफी योजना लागू करावी व तत्काळ नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे. प्रामाणिकपणे व नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहनपर अनुदान 50,000 रुपयांवरून थेट 1,00,000 रुपये करावे. तसेच 2025-26 मध्ये पीककर्ज घेऊन यंदा थकीत झालेल्या शेतकऱ्यांचाही या योजनेत समावेश व्हावा 1 रुपयात पीकविमा योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी. विमा कंपन्यांच्या हितासाठी वगळण्यात आलेले शेतकरी हिताचे सर्व 'ट्रिगर' पुन्हा लागू करून पिकांना पूर्ण विमा संरक्षण द्यावे. गेल्या वर्षी अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीपोटी जाहीर झालेली हेक्टरी 17,000 रुपयांची विमा मदत अद्याप अनेक ठिकाणी मिळालेली नाही, ती तात्काळ वितरित करावी. दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजनेच्या (MGNREGS) माध्यमातून जलसंधारण, शेतीसुधारणा व इतर विशेष कामे तातडीने सुरू करून हातांना काम द्यावे. बहुवार्षिक फळबागा जळून खाक होऊ नयेत म्हणून बागा जगवण्यासाठी स्वतंत्र शासकीय टँकर व्यवस्था सुरू करावी. तीव्र पाणीटंचाई असलेल्या गावांचे व वाड्यांचे तात्काळ सर्वेक्षण करून शासकीय टँकर सुरू करावेत. पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कोणत्याही अटींशिवाय चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पशुधनासाठी पाणी व वैद्यकीय सेवा पुरवाव्यात. दुष्काळात भारनियमनामुळे (लोडशेडिंग) पिकांना पाणी देणे कठीण होत आहे. त्यामुळे जळालेले विद्युत रोहित्र (DP) वेळेत बदलण्यासाठी व दुरुस्तीसाठी ऊर्जा विभागाच्या माध्यमातून राज्यभर विशेष मोहीम राबवावी. प्रत्येक जिल्ह्यातील दैनंदिन पर्जन्यमान, पिकांची सद्यस्थिती, पाणीटंचाई, चाऱ्याची उपलब्धता आणि जनावरांचे आरोग्य यावर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी राज्य आणि जिल्हा स्तरावर स्वतंत्र नियंत्रण कक्ष (वार रूम) कार्यान्वित करावेत. दुष्काळग्रस्त भागातील शाळा, महाविद्यालये आणि इतर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची केवळ परीक्षा फी माफ न करता, त्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा क्रांतिकारी निर्णय राज्य शासनाने तातडीने घ्यावा. शरद पवार यांनी पत्राच्या शेवटी नमूद केले आहे की, राज्यातील शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि संपूर्ण ग्रामीण समाज आजवरच्या अत्यंत बिकट संकटाला सामोरा जात आहे. या अभूतपूर्व संकटाची भीषणता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राजकारण बाजूला ठेवून सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतील आणि तातडीने अंमलबजावणीचे आदेश जारी करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## श्याम मुदुरुकोल्ला यांच्या चित्तथरारक कसरतींनी विद्यार्थ्यांची मने जिंकली

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ महेंद्र कुमार महाजन

**रिसोड :** श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे तेलंगणा येथून आलेले श्याम मुदुरुकोल्ला यांनी आपल्या अंगभूत कलागुणांचे अनोखे दर्शन घडवत विद्यार्थ्यांसमोर विविध चित्तथरारक व लक्षवेधी करतब सादर केले. त्यांच्या अफलातून सादरीकरणाने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची लहर पसरली असून, उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या कलाविष्काराला उत्स्फूर्त दाद दिली.

श्याम मुदुरुकोल्ला यांनी आपल्या कौशल्यपूर्ण सादरीकरणातून विविध प्रकारच्या कसरती व मनोरंजक करतबांचे प्रात्यक्षिक दाखविले. क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणाऱ्या त्यांच्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले. अवघड वाटणाऱ्या कसरती सहजतेने सादर करत त्यांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रत्येक प्रयोगाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांच्या कलात्मक जिज्ञासेला व मनोरंजनाला वाव देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यालयात आनंददायी वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांना विविध कला-कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी या माध्यमातून मिळाली. या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य जानराव देशमुख, ज्येष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्याम मुदुरुकोल्ला यांच्या कलाकौशल्याचे कौतुक केले. या आगळ्यावेगळ्या सादरीकरणाची विद्यार्थ्यांमध्ये दिवसभर चर्चा रंगली होती.

## उत्तमचंद बगडिया महाविद्यालयात श्री चक्रधर स्वामी जयंती उत्साहात साजरी

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ महेंद्र कुमार महाजन

**रिसोड :** येथील उत्तमचंद बगडिया कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख, एन.एस.एस. प्रमुख तथा सांस्कृतिक समितीप्रमुख प्रा. डॉ. खेडेकर मॅडम यांनी केले. त्यांनी मराठी विभागाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना श्री चक्रधर स्वामी यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.



यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महानुभाव संप्रदायाचे अभ्यासक प्रा. अमर साबळे उपस्थित होते. त्यांनी श्री चक्रधर स्वामी यांचे जीवन, तत्त्वज्ञान तसेच लीळाचरित्र या ग्रंथाचे ऐतिहासिक व साहित्यिक महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. महानुभाव पंथाच्या माध्यमातून मराठी भाषेच्या विकासाला मिळालेल्या चालनेवरही त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी श्री चक्रधर स्वामी यांच्या समता, अहिंसा, मानवता आणि सामाजिक समरसतेच्या विचारांचा स्वीकार करून ते आचरणात आणण्याचे आवाहन केले. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या मनात संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास प्रा. टिकार, प्रा. डॉ. बुधवंत, प्रा. डॉ. वानखेडे, प्रा. डॉ. नंदेश्वर, प्रा. राऊत, प्रा. राम जुनघरे, प्रा. बाजड, प्रा. वाघ, प्रा. पाठक मॅडम, प्रा. बांडे मॅडम, श्री ओंकार पुरी, डॉ. नरवाडे, डॉ. काळे मॅडम, डॉ. मनवर, प्रा. वानरे मॅडम, प्रा. जाधव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. गाडेकर, प्रा. सोळंकी, प्रा. प्रजापती, श्रीमती नरवाडे यांच्यासह सहकाऱ्यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. संदीप जुनघरे तर आभार प्रदर्शन प्रा. सुमित लाव्हरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मालेगाव शहरासह तालूक्यात सर्वच काही आलबेल

### पोलीस प्रशासनाचा कार्य शैलीवर प्रश्नचिन्ह, पोलीस अधीक्षक लक्ष देतील का?

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशीम :** मालेगाव शहरासह तालुक्यात सध्या कायदा व सुव्यवस्थेची वाट लागली असून पोलिसांचा वचक कमी झाला आहे मालेगाव पोलीस स्टेशनसमोरुन खुलेआम प्रवासी वाहतूक होत असून कधी नव्हते एवढे अवैध धंदे सुरू झाले असून या धंद्यावाल्या ना अभय कोणाचा हा प्रश्न निर्माण झाला असून यावर वेळीच आवर न घातल्यास एखांदी मोठी घटना घडल्याशिवाय राहणार नाही हे मात्र तेवढेच खरे तर शहरात चोरीच्या घटना वाढल्या असून मारहाण दादागिरी चे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून हत्याचा दोन घटना शहरात घडल्या आहेत तर पोलीस प्रशासन मोठी घटना घडण्याची वाट पाहत आहे का असा प्रश्न उपस्थित होत असून यावर वेळीच



अंकूश न लावल्यास मालेगाव चे बिहार झाला शिवाय राहणार नाही शहरातील काही ठीकानी खुले आम्ली पदार्थ विकले जात असून तरुण पिढीला आम्ली पदार्थ सहजतेने मिळत असल्याने युवापिढी व्यसनाधीन होत आहे अमली पदार्थाचे सेवन करणारी एक मोठी युवा पिढीची गँग तयार झाली असून व्यसन पूर्ण करण्यासाठी कुठल्याही स्तराला जाण्याची तयारी आहे यातूनच दोन वेळा शहरात प्राण घातक हल्ला झाला होता यावरही पोलीस प्रशासन कुठलीही कारवाई न केल्याने शहरात मोठा गँगवार झाल्याशिवाय राहणार नाही हे मात्र तेवढेच निश्चित यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे परंतु पोलीस प्रशासनाने धृतराष्ट्राची भूमिका घेतल्याने अशी परिस्थिती निर्माण झाल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे मालेगाव शहरात विविध ठिकाणी बेकायदेशीर धंदे खुलेआम सुरू असल्याचे दिसत असून,पोलीस स्टेशनसमोरच वाहतूक कोंडी होत असतानाही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने आश्चर्यच या पार्श्वभूमीवर आता जिल्हापोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे हे या प्रकरणात ॲक्शन घेणार का,असा सवाल उपस्थित केला जात असून,पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर येऊन कारवाई करतील अशी जनतेची अपेक्षा आहे.

## रस्ता गणेश विसर्जनापूर्वी पूर्ण करण्याची नागरिकांची मागणी नगरपंचायतला दिले निवेदन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले

**मालेगाव :** शहरातील प्रभाग क्रमांक १९ मध्ये जि.प.शाळेसमोरील रस्त्याच्या सौंदर्यीकरणाचे काम सुरू असताना काही व्यक्तींकडून कामात अडथळा निर्माण केला जात असल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे याबाबत नागरिकांनी १७ सप्टेंबर रोजी नगरपंचायत मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदन सादर केले.

निवेदनानुसार,जि.प.शाळेसमोरील रस्त्याचे सौंदर्यीकरण व पेव्हर ब्लॉकचे काम मंजूर असून,सध्या रस्त्याचे काम सुरू आहे मात्र,कामादरम्यान कथितरीत्या अडथळे निर्माण होत असल्याने काम



रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे निवेदनात नगरसेविकेचे पती महादेव खवले यांच्यावरही कामात अडथळा आणत असल्याचा आरोप करण्यात आला असून,या आरोपांची प्रशासनाने वस्तुनिष्ठ चौकशी करावी,अशी मागणी नागरिकांनी केली आहे हा रस्ता शाळकरी मुलांच्या दैनंदिन ये-जा करण्यासाठी तसेच परिसरातील नागरिकांच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा आहे याच मार्गाचा वापर दुर्गादेवी विसर्जन,हिंदू स्मशानभूमी तसेच आठवडी बाजाराकडे जाण्यासाठी केला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गणेश विसर्जनापूर्वी काम पूर्ण करून रस्ता नागरिकांसाठी सुरळीत खुला करावा,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे तसेच कामात अडथळा आणणाऱ्या बाबींची चौकशी करून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी,अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.


# मोहजाबंदी येथील हटकर समाजाच्या स्मशानभूमीला न्याय कधी?

### भूमी अभिलेखच्या मनमानीविरोधात गावकऱ्यांचा एल्गार, को-ऑर्डिनेट नुसार हद्द कायम करण्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षकांचे स्पष्ट आदेश

भारत संग्राम | प्रतिनिधी


✦ महेंद्र कुमार महाजन

**रिसोड :** वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील मौजे मोहजाबंदी येथील हटकर समाजाच्या शासकीय स्मशानभूमी मोजणीत मोठा घोळ झाला आहे. शासकीय नकाशातील को-ऑर्डिनेटनुसार खुणा न देता मनमानी पद्धतीने हद्द दाखवल्याने गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. याप्रकरणी डॉ. संतोष काळे यांच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी आणि जिल्हा अधीक्षकांनी पडताळणीचे नियमानुसार तात्काळ आदेश दिले आहेत. आता उप अधीक्षक भूमि अभिलेख रिसोड कार्यालयाने दि. ०४/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष पाहणी




ठरवली आहे.

मौजे मोहजाबंदी येथील सर्व्हे नंबर एक मधील स्मशानभूमी मोजणीत हा धक्कादायक प्रकार सामोरे आला आहे. शासनाने मंजूर



केलेल्या सीएएन नंबर १९४०१७ नुसार दि. २०/०३/२०२६ रोजी पोलीस बंदोबस्तात स्मशानभूमीची मोजणी करण्यात आली. त्यानंतर दि. ०६/०४/२०२६ रोजी मोजणी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर हद्दीच्या खुणा दाखवण्याचे काम पूर्ण केले होते. मात्र या दाखवलेल्या खुणा मूळ मोजणी नकाशातील अधिकृत को-ऑर्डिनेटनुसार नसल्याचे तपासणीत स्पष्टपणे उघड झालेले आढळून आले. या नियमबाहेर झालेल्या मोजणीविरोधात डॉ. संतोष काळे यांनी संबंधित प्रशासनाकडे तात्काळ अधिकृत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर दि. १५/०७/२०२६ रोजी दुरुस्त खुणा देण्यासाठी नोटीस बजावण्यात आली असूनही अधिकारी गैरहजर राहिल्याचे दिसले. या कर्मचाऱ्यांच्या बेजबाबदारपणाची गंभीर दखल घेऊन वरिष्ठ प्रशासनाने तात्काळ चौकशीचे कडक आदेश जारी केले आहेत. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख वाशिम यांनी दि. ०७/०८/२०२६ रोजी याबाबत महत्त्वाचे विशेष आदेश जारी केले आहेत. त्यांनी मोजणी अधिकारी १५ जुलैला गैरहजर का राहिले याची पडताळणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. उप अधीक्षक भूमि अभिलेख रिसोड यांनी नियमानुसार कारवाई करून अहवाल सादर करावा असे सांगितले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी दि. ०६/०८/२०२६ रोजी अर्जाची दखल घेऊन प्रचलित शासनादेशानुसार तात्काळ कारवाईचे निर्देश दिले. त्यानंतर उप अधीक्षक भूमि अभिलेख रिसोड यांनी दि. ०१/०८/२०२६ रोजी याबाबत अधिकृत पत्र जारी केले आहे. त्यानुसार दि. ०४/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष जागेवर तपासणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले. यावेळी मंडळ अधिकारी तलाठी ग्रामसेवक सरपंच आणि सर्व लगतधारकांनी जागेवर उपस्थित राहावे असे निर्देश देण्यात आले. पहिल्या शासकीय अहवालानुसार को-ऑर्डिनेटप्रमाणे हद्दीच्या खुणा कायम करून देण्याची सर्व गावकऱ्यांची एकमुखी मागणी समोर आली आहे. शासकीय नकाशात स्पष्ट नोंदी असताना चुकीच्या खुणा दिल्यामुळे सर्व ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात मोठा संताप व्यक्त केला आहे. स्मशानभूमी ही गावाची अस्मिता असून न्याय मिळेपर्यंत गावकऱ्यांचा लढा सतत सुरूच राहील असा इरादा व्यक्त झाला. योग्य हद्द कायम न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी संबंधित प्रशासनाला दिला आहे. प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे आणि दि. ०४/१०/२०२६ च्या प्रत्यक्ष जागेवरील पाहणीकडे संपूर्ण रिसोड तालुक्यातील सर्व नागरिकांचे मोठे लक्ष लागले आहे.

दैनिक
भारत संग्राम

शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ | वाशिम



## अग्रलेख

## माध्यमांचे स्वातंत्र्य

लोकशाहीचा 'चौथा स्तंभ' मानल्या जाणाऱ्या माध्यमांची स्वायत्तता, निष्पक्षता आणि सत्यनिष्ठा आज जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशात गंभीर धोक्यात आली आहे. कॉर्पोरेट भांडवलाचा प्रभाव, टीआरपीची (TRP) आंधळी शर्यत, राजकीय दबाव आणि सोशल मीडियावरून पसरणारे 'फेक न्यूज'चे जाळे यांमुळे पत्रकारितेच्या मूळ नैतिकतेला सुरुंग लागला आहे. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मूकनायक' या वर्तमानपत्रांनी सामाजिक जागृती आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जी धुरा सांभाळली होती, तिचे रूपांतर आज केवळ खळबळजनक बातम्या आणि द्वेषाधारित समीकरणांत झाले आहे. नागरिकांना अचूक माहिती देण्याऐवजी पूर्वग्रहदूषित अजेंडा राबवणारी माध्यमे ही लोकशाहीच्या पायालाच ठिसूळ करत असून, लोकशाहीचा हा चौथा स्तंभ वाचवणे ही आजच्या डिजिटल युगातील सर्वांत मोठी नैतिक आणि सामाजिक कसोटी बनली आहे. भारतीय संविधानाने कलम १९(१)(अ) अंतर्गत नागरिकांना दिलेल्या 'भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यातच' वृत्तपत्रांच्या व माध्यमांच्या स्वातंत्र्याचा अंतर्भाव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि घटना समितीने माध्यमांसाठी वेगळ्या स्वतंत्र हक्काची तरतूद न करता, त्याला नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाच एक भाग मानले होते; कारण माध्यमे ही जनतेचा आवाज बनून सत्तेला प्रश्न विचारण्याचे मुख्य काम करतात. स्वातंत्र्यापूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या दशकांत भारतीय माध्यमांनी देशाच्या नवनिर्माणात, सामाजिक सुधारणांमध्ये आणि आणीबाणीच्या काळात लोकशाहीचे रक्षण करण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. परंतु, गेल्या दोन दशकांत माहिती तंत्रज्ञानाचा झालेला विस्तार आणि प्रसारमाध्यमांचे झालेले अभूतपूर्व व्यापारीकरण यांमुळे पत्रकारितेची मूळ व्याख्याच बदलून गेली आहे. या संकटाच्या मुळाशी प्रामुख्याने 'कॉर्पोरेट भांडवलशाही' आणि 'टीआरपीचे (Target Rating Point) अर्थशास्त्र' आहे. आज बहुतांश मोठी दूरचित्रवाणी वृत्तवाहिन्या (TV News Channels) आणि वृत्तपत्रसमूह हे बड्या उद्योगपतींच्या आणि राजकीय पक्षांच्या थेट किंवा अप्रत्यक्ष मालकीखाली आले आहेत. जेव्हा माध्यमांचे मुख्य उद्दिष्ट 'जनहित' न राहता 'नफा कमवणे' बनते, तेव्हा निष्पक्ष बातमीदारांची जागा जाहितदार आणि मालकांचे हितसंबंध घेतात. चोवीस तास चालणाऱ्या वृत्तवाहिन्यांमध्ये प्रत्येक मिनिटाला प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी खळबळजनकता, अंधश्रद्धा आणि निरर्थक राजकीय डिबेट्सचा मारा केला जातो. देशासमोरील बेरोजगारी, महागाई, शेतीचे प्रश्न, शिक्षण आणि आरोग्याची दुरवस्था यांसारख्या गंभीर नागरी विषयांना बाजूला सारून धार्मिक ध्रुवीकरण आणि वैयक्तिक चिखलफेकीला प्राधान्य दिले जात आहे. सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या (WhatsApp, Facebook, X, YouTube) उदयाने या महापेचाला अधिक भयावह बनवले आहे. अल्गोरिदमच्या (Algorithms) तंत्रज्ञानामुळे युजर्सना त्यांच्याच पूर्वग्रहांना खतपाणी घालणारा मजकूर वारंवार दाखवला जातो, ज्यामुळे समाजात वैचारिक कट्टरता निर्माण होत आहे. खोट्या बातम्या (Fake News), एडिट केलेले व्हिडिओ, आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) मदतीने बनवलेले 'डीपफेक' व्हिडिओ अवघ्या काही सेकंदांत करोडो लोकांपर्यंत पोहोचतात. या अनियंत्रित माहितीच्या महापुरात 'सत्य' शोधणे सामान्य नागरिकासाठी अत्यंत कठीण बनले आहे. सोशल मीडियावरून पसरवले जाणारे चुकीचे इतिहास आणि द्वेषयुक्त मजकूर थेट सामाजिक सलोखा उद्ध्वस्त करत आहेत. दुसऱ्या बाजूला, पत्रकारांच्या सुरक्षेचा आणि स्वातंत्र्याचा प्रश्नही तितकाच गंभीर बनला आहे. सत्तेतील सरकारांवर किंवा भ्रष्टाचारावर टीका करणाऱ्या निष्पक्ष आणि शोधपत्रकारांवर (Investigative Journalists) कायदेशीर गुन्हे दाखल करणे, छापे टाकणे, किंवा कडक कायद्यांचा वापर करून त्यांना अडकवण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. आंतरराष्ट्रीय 'प्रेस फ्रीडम इंडेक्स' (Press Freedom Index) मध्ये भारताची सातत्याने होणारी घसरण ही जागतिक स्तरावर देशाच्या लोकशाही प्रतिमेला डाग लावणारी ठरत आहे. जेव्हा पत्रकारांना निर्भयपणे काम करता येत नाही आणि सत्ताधाऱ्यांची चाटुकारिता करणारे मॉडेल उभे राहते, तेव्हा लोकशाहीतील विरोधी पक्षाची आणि जनतेची ताकद क्षीण होते. असे असले तरी, डिजिटल युगात युट्यूब, स्वतंत्र न्यूज पोर्टल्स आणि शोधपत्रकारिता करणाऱ्या काही डिजिटल प्लॅटफॉर्म्सनी आशेचा किरण दाखवला आहे. कॉर्पोरेट अर्थकारणाला छेद देत 'क्राउड फंडिंग'च्या (Crowd-funded Journalism) माध्यमातून स्वतंत्र पत्रकारिता जिवंत ठेवण्याचे प्रयत्न होत आहेत. परंतु, या नवमाध्यमांवरही कडक सेन्सॉरशिप आणि नियंत्रणाची टांगती तलवार कायम आहे. या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला पुनरुज्जीवित करण्यासाठी आणि माध्यमांची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी खालील धोरणात्मक व सामाजिक सुधारणांची तातडीने गरज आहे: स्वायत्त नियामक प्राधिकरणाची स्थापना: 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया' (PCI) आणि न्यूज ब्रॉडकास्टिंग प्राधिकरणाला राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त करून अधिक स्वायत्तता व कडक दंडात्मक अधिकार दिले पाहिजेत. माध्यमांच्या मालकी हक्कांत पारदर्शकता (Media Ownership Transparency): वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांमधील राजकीय व कॉर्पोरेट मालकीची माहिती सार्वजनिक करणे बंधनकारक केले पाहिजे. एकाच संस्थेला किंवा घराण्याला माध्यमांमध्ये एकाधिकारशाही (Monopoly) स्थापन करण्यापासून रोखण्यासाठी कायदे केले पाहिजेत. व्यापक माध्यम साक्षरता (Media Literacy): शाळा-महाविद्यालयांमधून आणि समाजपातळीवर 'माध्यम साक्षरता' अभियान राबवले पाहिजे, जेणेकरून नागरिक खरी बातमी आणि प्रायोजित अजेंडा यांतील फरक ओळखू शकतील. पत्रकार संरक्षण आणि सामाजिक सुरक्षा: शोधपत्रकारांना कडक सुरक्षा देणारा स्वतंत्र कायदा देशभर लागू केला पाहिजे, ज्यामुळे ते कोणत्याही दबावाशिवाय काम करू शकतील. निष्पक्ष आणि निर्भय माध्यमे ही लोकशाहीची जीवन वाहिनी असतात. जेव्हा माध्यमे सत्तेच्या समोर झुकतात किंवा निव्वळ नफ्यासाठी सत्याचा बळी देतात, तेव्हा लोकशाहीचा पाया ढासळतो. सत्तेला निष्पक्ष प्रश्न विचारणारी आणि उपेक्षित घटकांचा आवाज बनणारी पत्रकारिता टिकवून ठेवणे ही केवळ पत्रकारांचीच नव्हे, तर सुजाण नागरिकांचीही संयुक्त जबाबदारी आहे.

## माणुसकीचा आधारवड आणि पत्रकारितेतील बुलंद आवाज



**डॉ. माधव हिवाळे**
मुख्य संपादक, दै. भारत संग्राम

# आर. जे. देव इंगोले यांच्या कार्याचा प्रेरणादायी प्रवास

**समाजात काही व्यक्ती आपल्या कार्याने ओळख निर्माण करतात, तर काही व्यक्ती आपल्या माणुसकीच्या वागणुकीने असंख्य हृदयांमध्ये स्थान निर्माण करतात. आदरणीय आर. जे. देव इंगोले सर हे अशाच संवेदनशील, मनमिळावू आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. मोठे बंधू, मार्गदर्शक, जिवलग मित्र आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील बुलंद आवाज म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.**

देव इंगोले सर यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांचे मोठे मन आणि माणुसकीची नाळ. एखाद्या व्यक्तीवर अडचण आली, संकटाचा काळ समोर उभा राहिला किंवा मदतीची गरज निर्माण झाली, की कोणताही स्वार्थ न ठेवता मदतीचा हात पुढे करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. स्वतःच्या अडचणी बाजूला ठेवून दुसऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, ही त्यांच्या स्वभावाची विशेष ओळख आहे. अडचणीच्या काळात आधार देणे, दुःखात खंबीरपणे सोबत उभे राहणे आणि आपल्या माणसांसाठी मनापासून झटणे, या गुणांमुळे त्यांनी अनेकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या सहवासात माणुसकी, आपुलकी आणि जिव्हाळा यांचा अनुभव येतो. नात्यांना केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीतून जपण्याची त्यांची वृत्ती प्रेरणादायी आहे. पत्रकारिता हे केवळ वृत्तांकनाचे माध्यम नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे, अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे आणि जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी साधन आहे. या क्षेत्रात आर. जे. देव इंगोले सर यांनी आपल्या खास शैलीने वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या शब्दांत ताकद आहे, आवाजात दम आहे आणि मांडणीत स्पष्टता आहे. आपल्या बुलंद आवाजातून सामाजिक प्रश्न, जनहिताचे मुद्दे आणि वास्तव परिस्थिती




प्रभावीपणे मांडण्याची शैली ही त्यांची पत्रकारितेतील विशेष ओळख ठरली आहे. बातमीच्या पलीकडे जाऊन विषयाची वस्तुस्थिती समजून घेणे आणि ती लोकांसमोर प्रभावीपणे मांडणे, या दृष्टिकोनातून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. 'पुढारी' चॅनेलचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. जिल्ह्यातील विविध प्रश्न, जनतेच्या अपेक्षा, प्रशासनाशी संबंधित विषय आणि सामाजिक घडामोडींना व्यासपीठ मिळवून देण्याचे काम त्यांच्या पत्रकारितेतून सातत्याने अधोरेखित होते. देव इंगोले सर हे केवळ पत्रकार नाहीत, तर अनेकांसाठी मार्गदर्शक आणि मोठ्या भावाप्रमाणे आधार देणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या अनुभवातून मिळणारे मार्गदर्शन, अडचणीच्या वेळी दिलेले धैर्य आणि योग्य वेळी केलेली मदत यामुळे त्यांच्याबद्दलचा आदर अधिक दृढ होतो. माणसांशी जोडलेले राहणे, नाती जपणे आणि समाजाशी आपले ऋणानुबंध कायम ठेवणे, ही त्यांच्या जीवनप्रवासाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या कार्यात प्रसिद्धीपेक्षा माणुसकीला, आणि व्यक्तिगत यशापेक्षा सामाजिक बांधिलकीला अधिक महत्त्व असल्याचे जाणवते. अशा या मनमिळावू, कर्तृत्ववान, संवेदनशील आणि बुलंद आवाजाच्या व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड ऊर्जा आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात अधिकाधिक यश लाभो. त्यांच्या हातून समाजहिताची, जनसेवेची आणि माणुसकीची अशीच प्रेरणादायी कार्ये घडत राहोत, हीच सदिच्छा. आदरणीय आर. जे. देव इंगोले सर यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा!

## रक्तदानातून जपली माणुसकीची नाळ; डॉ.भाग्यश्री पोफळे यांचा आदर्श पुढे!

भारत संग्राम | प्रतिनिधी
✦ प्रदीप सावले

**मालेगाव :** रक्तदान हे श्रेष्ठदान असून, आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाचा जीव वाचण्यास मदत होऊ शकते हीच सामाजिक बांधिलकी जपत विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला यावेळी डॉ.रवी दिनकर पोफळे आणि डॉ.भाग्यश्री रवी पोफळे यांनी स्वतः रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला अपघातग्रस्त रुग्ण,शस्त्रक्रिया,गंभीर आजार तसेच प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज भासणाऱ्या रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत महत्त्वाचे ठरते त्यामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे,या सामाजिक भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या



या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला विशेषत डॉ.भाग्यश्री पोफळे यांनी रक्तदान केल्याने महिलांमध्येही रक्तदानाविषयी सकारात्मक संदेश गेला स्वतः पुढाकार घेत रक्तदान करून त्यांनी 'आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचू शकतो' हा मानवतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला त्यांच्या या उपक्रमामुळे महिलांनीही रक्तदानासाठी पुढे यावे,असा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला यावेळी आयोजकांनी नागरिकांना आवाहन करताना,तुमची काही मिनिटांची सेवा एखाद्याला संपूर्ण आयुष्य देऊ शकते त्यामुळे निरोगी व पात्र नागरिकांनी रक्तदान करून माणुसकीची सेवा करावी,असे सांगितले शिबिरात मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सहभाग घेत रक्तदान केले.

## उद्ध्वस्त शेतकऱ्यांनी काढली सोयाबीनची प्रतिकात्मक अंत्ययात्रा!

### राजुरा येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन हेक्टरी एक लाख रुपये मदतीसह कर्जमाफीची मागणी...

भारत संग्राम | प्रतिनिधी
✦ प्रदीप सावले

**मालेगाव :** जिल्ह्यात गेल्या ४५ ते ५० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे तालुक्यातील राजुरा शेतशिवारात पावसाअभावी सोयाबीनचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असून,संतप्त शेतकऱ्यांनी स्वाभिमानीचे युवक प्रदेशाध्यक्ष दामू अण्णा इंगोले यांच्या नेतृत्वात उध्वस्त सोयाबीनची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढून राजुरा येथील स्मशानभूमीत अंत्यविधी केला शेंगा भरण्याच्या निर्णायक टप्प्यात पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीनची पिके वाळून गेली आहेत हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे या आंदोलनादरम्यान शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोयाबीन



पिकाचा प्रतिकात्मक अंत्यविधी करण्यात आला यावेळी शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी,पीक विम्याचा लाभ मिळवून द्यावा,कृषी पंपांचे वीज बिल माफ करावे आणि कर्जमाफी करावी,अशा मागण्या करण्यात आल्या सोयाबीनसोबतच तूर,कापूस,उडीद आणि हळद पिकांनाही पावसाअभावी मोठा फटका बसला असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले वाशिम जिल्ह्यात तातडीने पिकांचे पंचनामे करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा,अशी मागणीही करण्यात आली नुकसान भरपाई मिळे पर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा दामू अण्णा इंगोले यांनी दिला. दरम्यान,आम्ही मेल्यानंतरच आमच्या खात्यात पैसे टाकणार का? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी शासनाला केला खरीप हातचा गेल्यानंतर आता पावसाअभावी रब्बी हंगामावरही संकट निर्माण होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली असून,वर्षभराचा संसार कसा चालवायचा, या विवंचनेत शेतकरी सापडला आहे.

# कचरा आंदोलना नंतर : घंटागाडी सुरू: फटाके व नारळ फोडून स्वागत !

भारत संग्राम | प्रतिनिधी
✦ सचिन खंडारे

**बुलडाणा :** मेहकर तालुक्यातील अंजनी बु. ही ग्रामपंचायत नेहमीच कोणत्याना कोणत्या कारणाने चर्चेचा विषय ठरते. असाच वेगळा विषय बनला आहे. गावातील कचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावरून ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र नाराजी व संतापाला अखेर प्रशासनाकडून प्रतिसाद मिळाला. कचरा संकलनासाठी ट्रॅक्टर सुरू करण्यात आल्यानंतर विषेश आचार्यकारक ठरल्याने ग्रामस्थांनी त्याचे चक्क फटाके, नारळ फोडून, ट्रॅक्टरला हार घालून व सोबतच्या कर्मचाऱ्यांना रुमाल टोपी देऊन स्वागत केले. हे सर्व करण्यामागे कृतज्ञता आहे का अजुन काय हेही




लक्षात कोणाच्या आले नाही.

कचरा संकलनासाठी घंटागाडी उपलब्ध असूनही तिचा नियमित वापर होत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. त्यामुळे गावातील विविध दर्शनीय भागांत ऐन गणपती व महालक्ष्मी या मुख्य सणात कचरा प्रचंड मोठ्या प्रमाणात साचत असल्याचे नागरिकांचे म्हणणे होते. त्याचबरोबर काही भागांत दीड महिन्यापर्यंत नळाला पाणी सुद्धा मिळत नसल्याची तक्रार अनेक ग्रामस्थांनी केली आहे. या मूलभूत प्रश्नांवर तातडीने उपाययोजना न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयात कचरा टाकण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता. त्यानंतर ग्रामपंचायत मालकीची स्वातंत्र्य घंटागाडीचा विचार न करता तिसऱ्या दिवशी भाड्याने ट्रॅक्टर लावुन कचरा संकलनासाठी सुरू करण्यात करून ग्रामस्थांचे सांत्वन करण्यात आले. विशेष म्हणजे, कचरा संकलनाची गाडी दि १७ सप्टेंबर रोजी सुरू झाल्याचा ग्रामस्थांनी ज्या पद्धतीने आनंद व्यक्त केला, तो चर्चेचा विषय ठरला आहे. फटाके, नारळ, रुमाल टोपी,आणि हार घालून गाडीचे स्वागत करण्यात आले. एखाद्या नवीन वाहनाचे किंवा घरात अनेक वर्षांनी आनंदाची घटना घडल्याचे जसे स्वागत केले जाते, तसा उत्साह ग्रामस्थांमध्ये दिसून आला. या स्वागतामागे केवळ आनंद नसून " सार्वजनिक मूलभूत सुविधा मिळण्यासाठीही नेहमी नेहमी आंदोलन करावे लागते का?" हा प्रश्नही दडलेला आहे. कचरा संकलनाची गाडी सुरू करण्यासाठी ग्रामस्थांना आंदोलनाची भूमिका घ्यावी लागली आणि त्यानंतर कार्यवाही झाली, तर ग्रामपंचायत व ग्रामस्थांमधील संवाद आणि प्रशासनाची बेजबाबदारपणाच्या व अकार्यक्षम कार्यपद्धती याबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. हे अंजनी बु. ग्रामस्थांच्या आंदोलनाला उशिरा का होईना प्रशासनाकडून प्रतिसाद मिळाला. परंतु आता कचरा संकलनाची ही व्यवस्था नियमित किती दिवस सुरू राहते. त्याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे- "कचऱ्याची गाडी सुरू झाली; आता नळाला पाणी कधी येणार?" दीड महिन्यापासून पाणीपुरवठ्याची तक्रार असलेल्या भागांमध्ये नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन कोणती ठोस उपाययोजना करते, याची ग्रामस्थ प्रतीक्षा करत आहेत. ग्रामस्थांच्या स्वागताने दिलेला संदेश. कचरा गोळा करणाऱ्या ट्रॅक्टरचे एवढ्या उत्साहात स्वागत होणे ही एकीकडे प्रशासनाच्या कार्यवाहीबद्दलची कृतज्ञता आणि दिलासा दर्शवते; तर दुसरीकडे, मूलभूत सुविधा वेळेवर मिळणे ही सामान्य बाब असावी, त्यासाठी संघर्षाची वेळ येऊ नये, असा अप्रत्यक्ष संदेशही यातून दिसतो. तसेच पाणीपुरवठ्याचा प्रश्न किती लवकर सुटतो, हेच या संपूर्ण प्रकरणाचे पुढचे महत्त्वाचे टप्पे ठरणार आहेत. ग्रामस्थांच्या या अनोख्या स्वागतानंतर आता ग्रामपंचायत प्रशासन पुढची मूलभूत सुविधा कधी उपलब्ध करून देणार? -याकडे अंजनी बु. ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दैनिक भारत संग्राम, वाशिम RNI No. MAHMAR/2020/79677
हे वृत्तपत्र प्रकाशक महादा आश्रु हिवाळे यांच्याद्वारे दैनिक भारत संग्राम कार्यालय, वार्ड नं. डब्ल्यु३, प्रॉपर्टी नं. ७५७, महामाया निवास, नालंदानगर, वाशिम ता. जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) येथून मालक महादा आश्रु हिवाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक महादा आश्रु हिवाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक अशफाक बेग खान बेग यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स, फेज २, प्लॉट नं. डी-२०, पोलीस स्टेशन रोड, लोकेश दाल मिलच्या समोर, अकोला ता.जि. अकोला ४४४१०४ (महाराष्ट्र) येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करून पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास वाशिम न्यायालया अंतर्गत)

# देशात आयुर्वेद गुरुकुलम् महाविद्यालय आणि औषध परीक्षण प्रयोगशाळा सुरू करणाची केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली घोषणा

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ सचिन खंडारे**



**बुलढाणा :** आयुर्वेद शिक्षण, संशोधन आणि औषधांच्या गुणवत्तापूर्ण परीक्षणाला चालना देण्यासाठी देशात आयुष मंत्रालयाच्या वतीने आयुर्वेद गुरुकुलम् महाविद्यालये सुरू करण्यात येणार असून, केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान अनुसंधान परिषदेच्या आठ परिघीय संस्थांमध्ये औषध परीक्षण प्रयोगशाळा (DTL) सुविधा विकसित करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय आयुष तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी आज बुलढाणा येथे केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'शाश्वत विकासाची अविरत २५ वर्षे – सेवासंकल्प अभियान'अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, नगराध्यक्ष पूजा गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी रणजित मंडाले, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील आदी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले की, नागरिकांचे आरोग्य निरोगी व सक्षम राहण्यासाठी आधुनिक वैद्यकीय उपचारांसोबत आयुर्वेद, योग आणि पारंपरिक उपचार पद्धतींचा समन्वय साधून एकात्मिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर केंद्र व राज्य शासनाचा भर आहे. विविध आजारांचे वेळीच निदान झाल्यास उपचार अधिक परिणामकारक ठरतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला विशेष महत्त्व देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आयुर्वेद व योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळत असून अनेक देशांकडून या उपचार पद्धतींबाबत माहिती व प्रशिक्षणाची मागणी होत आहे. आयुर्वेद, योग आणि आधुनिक वैद्यकीय उपचारांचा समन्वय झाल्यास नागरिकांना अधिक व्यापक आरोग्य सुविधा उपलब्ध होऊ शकतात. याच उद्देशाने देशभरात आयुष्मान आरोग्य मंदिरे तसेच आयुष विभागाच्या विविध सेवा कार्यान्वित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दिल्ली येथील अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या धर्तीवर देशाच्या विविध भागांत आयुर्वेद शिक्षण व संशोधनाच्या सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आयुर्वेद व योगाचा प्रसार देशाच्या सीमांपलीकडे होत असून, २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन आणि २३ सप्टेंबर हा आयुर्वेद दिन म्हणून साजरा केला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. बुलढाणा येथील राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांना अधिक सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध होत आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून भविष्यात राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रतिवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतच्या उपचाराची सुविधा दिल्या जात आहे. तसेच ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठीही आरोग्य संरक्षण दिले आहे. महागड्या उपचारांचा खर्च गरीब कुटुंबांवर पडू नये, उपचाराअभावी कोणालाही आजार लपवावा लागू नये आणि प्रत्येक नागरिकाला सन्मानाने व निरोगी जीवन जगता यावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आरोग्य सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांचा लाभ पात्र नागरिकांनी घ्यावा, असेही आवाहन प्रतापराव जाधव यांनी केले. आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा येथे उपलब्ध होत असलेल्या वैद्यकीय व शैक्षणिक सुविधांची माहिती दिली. राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळत आहे. कृषी महाविद्यालयात ६० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय असून, बी.एससी. नर्सिंग व आधुनिक पदवी अभ्यासक्रमांमुळे आरोग्य शिक्षण क्षेत्राला गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी, योग व निसर्गोपचार पद्धतींचा एकत्रित लाभ नागरिकांना मिळावा यासाठी आयुर्वेद महाविद्यालयाच्या अनुषंगाने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बायपास सर्जरी, अँजिओप्लास्टी, क्रिटिकल केअर व न्यूरोसर्जरीसह विविध सुविधा विकसित करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. ५० खाटांच्या आयुष रुग्णालयाचे भूमिपूजन सेवासंकल्प अभियानांतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय परिसरात ५० खाटांच्या सुसज्ज आयुष रुणालयाचे भूमिपूजन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या रुग्णालयामुळे जिल्ह्यातील गोरगरीब व गरजू नागरिकांना आयुष उपचार पद्धतींच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा पर्याय उपलब्ध होणार आहे. आयुर्वेद गुरुकुलम् महाविद्यालय : प्रतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून देशभर आयुष मंत्रालयाच्यावतीने आयुर्वेद गुरुकुलम् महाविद्यालय सुरू करणार आहे. आयुर्वेद गुरुकुलम् ही निवासी आयुर्वेद संस्था असून, येथे दोन वर्षांचा प्री-आयुवेदा कार्यक्रमासह साडेसात वर्षांचा बीएएमएस पदवी अभ्यासक्रम राबविला जाईल. अध्यापनाचे माध्यम संस्कृत असेल. इयत्ता १० वी नंतर NEET द्वारे प्रवेश दिला जाईल. सर्व गुरुकुलम् केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, जनकपुरी, नवी दिल्ली यांच्याशी संलग्न असतील. पूर्व-आयुर्वेद अभ्यासक्रमात संस्कृत, इंग्रजी/भारतीय भाषा, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, भारतीय दर्शन-शास्त्रे आणि आयुर्वेदाची ओळख यांचा समावेश असेल. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून महाराष्ट्र, आसाम, उत्तराखंड, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश या ५ राज्यांकडून आयुर्वेद गुरुकुलम् स्थापनेसाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान अनुसंधान परिषद परिघीय संस्थांमध्ये औषध परीक्षण प्रयोगशाळा : आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान अनुसंधान परिषदच्या आठ परिघीय संस्थांमध्ये DTL सुविधा विकसित करण्यात येणार आहे. यामुळे आयुर्वेद, सिद्ध व युनानी (ASU) औषधांची गुणवत्ता तपासणी, प्रमाणीकरण आणि मानकीकरण अधिक सक्षम होईल. पुणे, पटियाला, जम्मू, कोलकाता, गुवाहाटी, भुवनेश्वर, चेरुथुरुथी आणि बंगळुरू येथे या सुविधांचे संचालन/बळकटीकरण करण्यात येणार आहे. या नेटवर्कमुळे विकेंद्रित औषध परीक्षण सुविधा, जलद तपासणी, संशोधन व गुणवत्ता हमी यांना चालना मिळून देशभर ASU औषधांच्या गुणवत्तापूर्ण परीक्षणासाठी राष्ट्रीय DTL नेटवर्क निर्माण होईल.

## थोडक्यात



### दिव्यांग व वयोवृद्धांना सहाय्यभूत साहित्याचे केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते वितरण

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ सचिन खंडारे**

**बुलढाणा :** समाजातील दिव्यांग, वयोवृद्ध तसेच गरजू नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेले सहाय्यभूत साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अशा गरजू नागरिकांची सेवा करणे हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवासंकल्प अभियान'अंतर्गत प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, नगराध्यक्ष पूजा गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा महिल व बालविकास अधिकारी प्रमोद एंडोले, प्रधानमंत्री दिव्याशा डॉ. गौरव बरोई, दिव्यांग कल्याण व पुनर्वसन संस्थाचे अध्यक्ष सुरेश छाजेळ, सचिव जयसिंग जयवार आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते 280 पेक्षा जास्त दिव्यांग व वयोवृद्ध लाभार्थ्यांना 26 लाखाचे विविध सहाय्यभूत साहित्याचे वाटप करण्यात आले. हात-पायांच्या हालचालींमध्ये अडचण असणाऱ्या तसेच दैनंदिन कामांसाठी इतरांच्या मदतीची आवश्यकता असणाऱ्या नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. यामध्ये व्हीलचेअर, कमोड चेअर यांसह विविध सहाय्यक साधनांचा समावेश होता. यावेळी बोलताना केंद्रीय राज्यमंत्री जाधव म्हणाले की, वयोमानानुसार अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक क्षमतेवर मर्यादा येतात. काहींना चालणे, उभे राहणे अथवा स्वावलंबीपणे दैनंदिन कामे करणे कठीण होते. अशा नागरिकांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या दैनंदिन जीवनात मोठी मदत होते. दिव्यांग नागरिकांसाठी आवश्यक साधनांचे वाटप करण्याचे काम वर्षभर सातत्याने सुरू असते. वयोवृद्ध नागरिकांना गंभीर आजारांवरील उपचाराचा मोठा आर्थिक भार सहन करावा लागू नये, यासाठी केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घ्यावा. तसेच गावातील आशा सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच संबंधित आरोग्य यंत्रणेमार्फत याबाबतची माहिती घेऊन कार्ड काढून घेण्याचे आवाहन श्री. जाधव यांनी केले. आजारी पडल्यानंतर उपचारासाठी आर्थिक अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी नागरिकांनी आधीच आवश्यक आरोग्यविषयक कागदपत्रे व योजनांचा लाभ घेऊन ठेवणे गरजेचे आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांमधून पात्र लाभार्थ्यांना उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार संजय गायकवाड म्हणाले की, जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम वेगाने सुरू असून, सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. तसेच आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाच्या माध्यमातूनही आरोग्य सुविधा बळकट करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. वयोवृद्ध आई-वडिलांची काळजी घेणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या उतारवयात आधाराची आवश्यकता असते. त्यामुळे कुटुंबासह समाजातील प्रत्येक घटकाने दिव्यांग व वयोवृद्ध नागरिकांच्या सेवेसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये दहावी-बारावीच्या लेखी परीक्षा

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ महेंद्र कुमार महाजन**

**रिसोड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षांच्या लेखी, प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षांच्या कालावधीबाबत मंडळाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

मंडळाच्या सूचनेनुसार इयत्ता बारावीची लेखी परीक्षा सोमवार, दि. ८ फेब्रुवारी २०२७ ते मंगळवार, दि. १६ मार्च २०२७ या कालावधीत होणार आहे. तर इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सोमवार, दि. १५ फेब्रुवारी २०२७ ते गुरुवार, दि. ११ मार्च २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. तसेच बारावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा बुधवार, दि. २० जानेवारी २०२७ ते शनिवार, दि. ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत, तर दहावीच्या संबंधित परीक्षा गुरुवार, दि. २८ जानेवारी २०२७ ते शनिवार, दि. १३ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत घेण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळांमार्फत परीक्षा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नियोजन तसेच परीक्षेपूर्वीचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने संभाव्य तारखा जाहीर करण्यात आल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे. विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांनी अंतिम वेळापत्रकाची अधिकृत माहिती तपासावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अंजीरवाडीच्या गणरायाची मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते विधिवत प्रतिष्ठापना

## भुजबळ कुटुंबाची अंजीरवाडी गणेशोत्सवाशी दशकांची जिव्हाळ्याची नाळ; भक्तिभावाने आरती व दर्शन

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ प्रविण पाटील**



**नाशिक येवला :** माझगाव, दि. १८ सप्टेंबर : माझगाव येथील अखिल अंजीरवाडी सार्वजनिक उत्सव मंडळाच्या श्री गणरायाची राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी सहकुटुंब व सपत्नीक विधिवत प्रतिष्ठापना केली. यावेळी त्यांनी श्री गणरायाची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. तसेच सर्वांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि यशासाठी श्री गणरायाच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना केली.

अंजीरवाडीच्या गणेशोत्सवाशी मंत्री छगन भुजबळ यांच्या कुटुंबाचे नाते केवळ उत्सवापुरते मर्यादित नसून, अनेक दशकांच्या जिव्हाळ्याच्या आठवणी, परंपरा आणि आपुलकीने जोडलेले आहे. सन १९४९ मध्ये स्थापन झालेल्या या ऐतिहासिक मंडळाच्या माध्यमातून गेल्या अनेक दशकांपासून गणेशभक्तीची परंपरा जपली जात आहे. यंदाचा गणेशोत्सव हा या समृद्ध परंपरेला पुढे नेणारा आनंदाचा क्षण ठरत आहे. भक्ती, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम असलेल्या अंजीरवाडी गणेशोत्सवाच्या माध्यमातून दरवर्षी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. मंडळाचा आकर्षक देखावा आणि त्यामागील सामाजिक संदेश हे गणेशभक्तांसाठी विशेष आकर्षण ठरते. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ यांच्यासह भुजबळ कुटुंबातील सदस्य, अखिल अंजीरवाडी सार्वजनिक उत्सव मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच अंजीरवाडी आणि माझगाव परिसरातील गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाळू व्यवसायातील 10 लाखांसाठीपरळीच्या तरुणाचा लातूरमध्ये खून, परळीच्या नगरसेवकाने पाळत ठेवत घडवले हत्याकांड

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**लातूर :** वाळूच्या व्यवसायात पार्टनर करतो म्हणून घेतलेले १० लाखरुपये परत मागितल्याने परळी येथील ३५ वर्षीय तरुणाचालातुरात खून करण्यात आला. ही घटना बुधवारी मध्यरात्री ११ वाजेच्या सुमारास उस्मानपुरा भागातील एका हॉटेलसमोर घडली. या घटनेतील संशयित आधीच हॉटेलमधे जमले होते आणि बाहेर उभ्या केलेल्या कारमध्ये कोयता आणि सुरा त्यांनी लपवून ठेवला होता. खून केल्यानंतर मुख्य संशयित तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचा परळीचा नगरसेवकअल्ताफ सरदारखाँ पठाण हा आपल्या दोन सहकाऱ्यांसह पसार झाला आहे.संशयितांनी परळीपासून पाळत ठेवत लातूरमध्ये हत्याकांड घडवले. मन्सूरअली शेख लायकअली शेख(३५, रा.परळी) असे या घटनेतील मृताचेनाव आहे. त्याने अल्ताफ पठाण याला १०लाख रुपये दिले होते. मन्सूरअलीने पैसेपरत मागितल्याने त्यांच्यात काहीदिवसांपासून वाद सुरू होते. मन्सूरअली मित्रांसोबतजेवणासाठी ते उस्मानपुरा येथील हॉटेलमध्ये जाणारअसल्याची माहिती मिळताच संशयित अल्ताफ पठाण,खालेद हमीद शेख आणि उमर मेहबूब शेख यांनी रात्री १०.३०वाजता मन्सूरसोबत भांडण उकरुन काढत त्याचा खून केला.

# लोणारचे आराध्य दैवत माँ कमळजा मंदिर महिन्यांपासून पाण्याखाली, प्रशासन सुस्त; भाविकांचा संयम संपला, आता तीव्र जनआंदोलनाचा एल्गार

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ प्रणव वराडे**



**लोणार :** लोणार शहराचे आराध्य दैवत असलेले आई माँ कमळजा मातेचे मंदिर गेल्या बऱ्याच दिवसांपासून लोणार सरोवराच्या पाण्याखाली आहे. परंतु प्रशासनाच्या कमालीच्या हलगर्जीपणामुळे पाण्याची पातळी कमी होण्याऐवजी वाढतच चालली असून, आता संपूर्ण मंदिर पूर्णपणे पाण्याखाली जाण्याची गंभीर चिन्हे दिसत आहेत.

प्रशासनाची ही उदासीन भूमिका पाहून अखेर मातेच्या सर्व भक्तांचा संयम संपला असून, आता त्यांनी तीव्र जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार केला आहे. भाविकांनी सांगितले की, या प्रश्नावर आम्ही अनेक वेळा प्रशासनाला निवेदने दिली, अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून विनवणी केली, मात्र प्रत्येक वेळी मिळाले ते फक्त पोकळ आश्वासन. प्रत्यक्ष जागेवर कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नाही. येत्या काही दिवसात शारदीय नवरात्री उत्सव सुरू होत आहे. या नवरात्रीमध्ये लोणारच्या कमळजा मातेच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक भक्त येत असतात. मंदिरच पाण्याखाली असल्याने दर्शन झाले आहे . त्यामुळे आता हा विषय अधिकच तापला आहे. आज दि. 15 सप्टेंबर रोजी भाविकांनी तहसीलदार लोणार यांना निवेदन देऊन एकच ठाम मागणी केली आहे - "काहीही करा, पण आमचे कुलदैवत आई कमळजा मातेचे मंदिर पाण्याच्या बाहेर काढून द्या!" निवेदनात भाविकांनी मागणी केली आहे की, ASI/ पुरातत्व विभाग, जिल्हा प्रशासन, लोणार सरोवर विकास समिती, वन विभाग आणि भक्त प्रतिनिधी यांची तातडीने संयुक्त बैठक घेऊन मंदिर वाचवण्यासाठी कायदेशीर, तांत्रिक आराखडा आणि वेळमर्यादा जाहीर करावी. दि. २२ सप्टेंबर २०२६, मंगळवारपर्यंत ठोस निर्णय आणि प्रत्यक्ष काम सुरू न झाल्यास चक्का जाम, उपोषण, जलसमाधी सारखे तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्यात येईल, असा अंतिम इशारा भाविकांनी दिला आहे. जर प्रशासनाने तात्काळ उपाययोजना केली नाही आणि नवरात्रीच्या काळात लाखो भाविकांमध्ये जनआक्रोश निर्माण झाला, तर त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो आणि प्रशासनाला माता कमळजा भक्तांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल, एवढे मात्र खरे. "आम्हाला आश्वासन नको, आम्हाला ठोस निर्णय हवा. आम्हाला चर्चा नको, तर प्रत्यक्ष काम सुरू झालेले पाहिजे," अशी संतप्त भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

# खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांवर त्रिमूर्ती नगर मित्र मंडळाचा प्रबोधनात्मक देखावा

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ प्रविण पाटील**




**नाशिक येवला :** नाशिक, दि. १६ सप्टेंबर २०२६ : पंचवटी परिसरातील हिरावाडी रोड येथे त्रिमूर्ती नगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व मदत फाऊंडेशनच्या वतीने नाशिक शहरातील खड्डे, त्यामुळे होणारे अपघात व नागरिकांचे जाणारे बळी याबाबत जनजागृती करणारा समाजप्रबोधनात्मक गणेशोत्सव देखावा साकारण्यात आला आहे. संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा देखावा साकारण्यात आला असून, नाशिककरांचे लक्ष शहरातील विविध नागरी समस्यांकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत जनजागृती आणि समाजप्रबोधनाची परंपरा सुरू केली. त्याच परंपरेला पुढे नेत आजही गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले जाते. याच उद्देशाने त्रिमूर्ती नगर मित्र मंडळाने नाशिकच्या ज्वलंत नागरी प्रश्नांना आपल्या देखाव्यातून वाचा फोडली आहे. शहरातील रस्त्यांवर पडलेले मोठमोठे खड्डे, खड्ड्यांमुळे होणारे अपघात व त्यात जाणारे निष्पाप नागरिकांचे बळी, रस्त्यालगतची वृक्षतोड आणि त्यामुळे वाढणारे प्रदूषण, तसेच वाहतूक कोंडी यांसारख्या गंभीर प्रश्नांचा जाब या देखाव्यातून गणरायाच्या माध्यमातून विचारण्यात आला आहे. 'नाशिक शहरातील रस्त्यांचे काम कुंभमेळ्यापर्यंत पूर्ण होणार का?', असा प्रश्नही देखाव्यातून उपस्थित करण्यात आला आहे. खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या नाशिककरांच्या भावना व्यक्त करत 'पुढच्या वर्षी मी याच शहरात यावे की नाही?', असा मनाला भिडणारा सवाल गणरायाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. नाशिक शहर हे धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे शहर असून आगामी काळात शहरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते दर्जेदार, सुरक्षित आणि खड्डेमुक्त असणे अत्यंत आवश्यक आहे. नाशिककरांना खड्ड्यांचा त्रास न होता सुरक्षित प्रवास करता यावा, शहर स्वच्छ, सुंदर, हिरवेगार आणि वाहतूक कोंडीमुक्त व्हावे, तसेच 'सुंदर आणि खड्डेमुक्त नाशिक' ही ओळख निर्माण व्हावी, हा सकारात्मक संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी आणि जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरू शकतो, याचे उदाहरण त्रिमूर्ती नगर मित्र मंडळाच्या या देखाव्याने निर्माण केले आहे. नागरिकांनीही शहराच्या विकासासाठी प्रशासनासोबत सहकार्य करून स्वच्छ, सुरक्षित, सुंदर आणि खड्डेमुक्त नाशिक घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

## थोडक्यात



### नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची मान उंचावली; भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी मोताळा मंडळाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या नियोजनासाठी स्वामी समर्थ मंगल कार्यालय, मोताळा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना विजयराज शिंदे म्हणाले की, मोदीजींनी देशासमोर 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हा विचार ठेवला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचविणे, गरीब, शेतकरी, महिला, युवा तसेच वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणे, हा सेवाभाव आपल्या कार्याचा आधार असला पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक व्यासपीठावर आपली भूमिका अधिक प्रभावीपणे मांडली आहे. भारताच्या G20 अध्यक्षपदाच्या काळात नवी दिल्ली घोषणेवर सदस्य देशांची सहमती झाली. तसेच आफ्रिकन युनियनला G20 चे कायमस्वरूपी सदस्यत्व मिळाले. भारताने विकसनशील देशांच्या प्रश्नांना जागतिक व्यासपीठावर अधिक महत्त्व मिळवून देण्याचा प्रयत्न केला. अंतराळ क्षेत्रात चांद्रयान-3 चे यशस्वी चंद्रावर अवतरण ही भारताच्या वैज्ञानिक क्षमतेची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. डिजिटल क्षेत्रात UPI सारख्या तंत्रज्ञानामुळे भारताची डिजिटल क्षमता जगासमोर आली आहे. या सर्व बाबींकडे केवळ शासनाची कामगिरी म्हणून न पाहता, कोट्यवधी भारतीयांच्या सामूहिक सामर्थ्याचे प्रतीक म्हणून पाहिले पाहिजे. यामुळे आज भारताची मान जगाच्या व्यासपीठावर उंचावली आहे, असेही शिंदे यांनी सांगितले. मोदीजींच्या जन्मदिनानिमित्त प्रत्येक कार्यकर्त्याने सेवाभावाने समाजासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. रक्तदान, आरोग्यसेवा, स्वच्छता, वृक्षारोपण, गरजूंची मदत तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून सेवा कार्याला गती देण्याचे आवाहन करण्यात आले. दि. 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर या कालावधीत महिनाभर विविध सेवा उपक्रम राबविण्याचे नियोजन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमात मोताळा तालुक्यातील आदर्श अंगणवाडी सेविकांचा मा. आमदार विजयराज शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये वंदना ढकचवडे – अंगणवाडी सेविका, सारोळा मारुती, अरुणा माहुरे सहस्त्रमुडी तांडा,ज्येष्ठा अंगणवाडी सेविका प्रमोदिनी राऊत पुन्हई यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सेवा संकल्प अभियानाच्या अंतर्गत मोताळा येथे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा तालुकाध्यक्ष सचिन शेळके यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भाजपा जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, जिल्हा सरचिटणीस यशवंत पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गजानन घोंगडे, मनोहर नारखेडे, ज्येष्ठ नेते तुळशीराम मापारी, बिहारी चोपडे, देविदास वानखेडे, नारायण हेलगे, हाजी भाई, गणेशभाई जवरे, मा. जि. प. सदस्य पुरुषोत्तम लखोटिया, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष दत्ता पाटील, मोताळा शहराध्यक्ष चंद्रशेखर चोपडे, तालुका सरचिटणीस नारायण देशमुख, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अंजली पाटील, कुमुदिनीताई कोलते, बळीराम अंभोरे, तालुका उपाध्यक्ष सुनील भामद्रे,संजय वाघ, नाना राजगुरे, किशोरसिंह ठाकूर, दादाराव जुनारे, राजेंद्र धोरण, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष प्रतिक इंगळे, पुरुषोत्तम दाते, पद्माकर सरोदे, गजानन पांडे, बळीराम सातपुते, जीवन मापारी सरपंच काबरखेड, गणेश बिचकुले, तुकाराम राठोड, गजानन आटोळे, अमोल परमार, विजय मानकर, संतोष वाढे, स्वप्निल खर्चे, निळकंठ बढे, दीपक मिरगे, दिलीप येरावळ, श्रीकृष्ण सुरळकर, कैलास पाटील, अक्षय पैसोळे, अजयसिंग राजपूत, विनोद वानखेडे, बाळूभाऊ मिरगे, रोहिदास राठोड, लखन सपकाळ, विठ्ठल भारसाकडे, सुधाकर मापारी, गोपाल गोड यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'सेवा हीच साधना, जनसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून महिनाभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला

### मालेगाव उपमहापौरांच्या याचिकेवर हायकोर्टाची राज्य सरकारला नोटीस

भारत संग्राम | प्रतिनिधी

**नाशिक :** मालेगाव महानगरपालिकेच्या उपमहापौर कार्यालयातील टिपू सुलतान यांच्या प्रतिमेवरून पेटलेला राजकीय व सामाजिक वाद आता थेट मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला आहे. महापालिका प्रशासनाने दालनातून हटवलेली टिपू सुलतान यांची प्रतिमा पुन्हा सन्मानाने लावण्याची परवानगी मिळावी, यासाठी समाजवादी पक्षाच्या उपमहापौर शान-ए-हिंद यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने राज्य सरकार, मालेगाव महापालिका आणि पोलीस प्रशासनाला अधिकृत नोटीस बजावली असून, आपली भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे हिंदुत्ववादी संघटनांसह राज्य सरकारचीही कायदेशीर कोंडी होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

# आदिवासी मंत्री व सामाजिक न्याय मंत्र्याच्या घरांवर SC, ST समूहांचा धडक मोर्चा!

## बुलढाणा येथील शेकडो वंचित कार्यकर्ते सुद्धा मोर्चात सहभागी

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे




**बुलढाणा :** अनुसूचित जाती आणि जमातीच्या (एससी-एसटी) विकासासाठी राखीव असलेला ३६०१.१३ कोटींचा निधी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी वळवण्यात आल्याचा तीव्र निषेध नोंदवत अनुसूचित जाती, जमातीच्या समूहांनी वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्या औरंगाबाद येथील घरावर तर आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील घरावर धडक मोर्चा नेला.

औरंगाबाद येथील आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, राज्य कार्यकारिणी सदस्य आणि शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते . यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांनी राज्य सरकारवर थेट हल्लाबोल केला. एससी-एसटीच्या निधीचा काय घोटाळा केला, हे महाराष्ट्राच्या जनतेसमोर आलेच पाहिजे, अशी रोखठोक भूमिका पातोडे यांनी मांडली. सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळवून मागासवर्गीय समाजाच्या हक्कांवर गदा आणल्याचा आरोप करत आंदोलकांनी मंत्री संजय शिरसाट यांच्या घराबाहेर जोरदार घोषणाबाजी केली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा झाला असून यात SC, ST समूहांचा निधी पळवण्यात आला तसेच राज्य सरकारने या योजनेसाठी मोठी तरतुद करून 1500 कोटी रुपये अतिरिक्त ठेवले होते, असे असतांना ही आदिवासी विभागातून 1 हजार कोटी रुपये तर समाज कल्याण विभागातून 3500 कोटी रुपये पळवले आहेत. राज्य सरकारच्या ह्या योजनेवर केंद्र सरकारच्या कॅगने यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे म्हटले आहे. छत्रपती संभाजी नगर येथील मोर्च्यात पोलिसांनी विनाकारण आंदोलनकर्त्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न कार्यकर्त्यांनी हाणून पाडला. दुसरीकडे यवतमाळ येथेही वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वात एससी-एसटी समाजाने आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या घरावर मोर्चा नेला. एससी-एसटीच्या हक्काच्या ३६०१.१३ कोटी निधीची लूट करणाऱ्या कमिशनखोर धोरणाचा धिक्कार करत आंदोलकांनी मंत्री अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील घरासमोर निदर्शने सुरू केली आहेत. राज्य शासनाने हा निर्णय तातडीने मागे न घेतल्यास हे आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीकडून देण्यात आला आहे. या मोर्चामध्ये वंचित बहुजन युवा आघाडी चे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष विशाल गवई यांच्यासह शेकडो कार्यकर्ते मोर्चामध्ये सहभागी झाले होते ' सामाजिक न्याय विभागा अंतर्गत अनेक योजना अनुसूचित जातीमधील नागरिकांना मिळत नसून सदर निधी इतरत्र वळू नये अशी मागणी आपण सातत्याने करणार असल्याचेही यावेळी विशाल गवई यांनी सांगितले '

## विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी निरीक्षकांचा बुलढाणा दौरा निश्चित

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार बुलढाणा जिल्ह्यामध्ये २० जून २०२६ पासून १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्तांची बुलढाणा जिल्ह्यासाठी 'मतदार यादी निरीक्षक' (Electoral Roll Observer) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादी निरीक्षकांना पुनरीक्षण कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत जिल्ह्याला एकूण तीन भेटी देणे बंधनकारक आहे. यामध्ये दावे व हरकती सादर करणे, त्यांची विल्हेवाट लावणे आणि अंतिम प्रसिद्धीपूर्वीची पडताळणी या टप्प्यांचा समावेश आहे. त्यापैकी पहिल्या दोन भेटींचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे: पहिली भेट (First Visit): २३ सप्टेंबर २०२६ रोजी होणार असून, यादरम्यान सकाळी ११:०० वाजता मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दुसरी भेट (Second Visit): ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. याबाबतची अधिकृत माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गौणवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीला-लिस्टिंगला टाटा ट्रस्ट्सचा विरोध, निर्णयाला 66% हिस्सेदार टाटा ट्रस्ट्सचे आव्हान

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** देशातील सर्वात मोठ्या उद्योग समूहांपैकी एक टाटा समूहात बोर्डरूममधील लढाई उघडपणे समोर आली आहे. गुरुवारी टाटा सन्सच्या बोर्डाने 3 तासांच्या बैठकीत 2 मोठे निर्णय घेतले. पहिला, एन. चंद्रशेखरन यांना तिसऱ्यांदा 5 वर्षांसाठी एक्झिक्युटिव्ह चेअरमन बनवण्यास मंजुरी दिली. दुसरा, टाटा सन्सला शेअर बाजारात लिस्ट करण्याची प्रक्रिया सुरू केली जावी. मात्र, टाटा सन्समध्ये 66% हिस्सेदारी असलेल्या टाटा ट्रस्ट्सने याला कायदेशीरदृष्ट्या अमान्य ठरवले आहे. ट्रस्ट्सने निवेदन जारी करून म्हटले की, बैठकीत चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीच्या बाजूने 4 डायरेक्टर आणि विरोधात नोएल टाटा (रतन टाटा यांचे सावत्र भाऊ) होते. असे असूनही, टाटा ट्रस्ट्स 4-1 बहुमताला पुरेसे मानत नाही. त्यामुळे त्यांना ही नियुक्ती मान्य नाही. 63 वर्षीय चंद्रशेखरन यांचा कार्यकाळ 20 फेब्रुवारी 2027 पर्यंत आहे. त्यांनी 12 ऑगस्ट रोजी सांगितले होते की ते पुढचा कार्यकाळ घेणार नाहीत, पण 3 सप्टेंबरला नॉमिनेशन कमिटीने फेरविचार करण्याची विनंती केली. गुरुवारी चंद्रशेखरन तयार झाले. समूहाचा महसूल तिप्पट: 2019 मध्ये 6 लाख कोटी होता. 2026 मध्ये 16.24 लाख कोटी झाला. टाटा संसची संपत्ती चौपट: 2018 मध्ये 43,252 कोटी होती. 2026 मध्ये 1,79,010 कोटी झाली आहे. लिस्टेड कंपन्यांचे भांडवलीकरण तिप्पट: 2020 मध्ये 9.2 लाख कोटी होते. 2026 मध्ये 24 लाख कोटी राहिले. बोर्डाचा निर्णय हा अंतिम टप्पा नाही. आता जनरल बॉडी मीटिंगमध्ये भागधारकांची मंजुरी घेतली जाईल. इथे टाटा ट्रस्ट्स 66% हिस्सेदारीमुळे मजबूत स्थितीत आहे. त्यामुळे तिथे नवा वाद समोर येऊ शकतो. निर्णयाला कायदेशीर आव्हानही दिले जाऊ शकते. गुरुवारी टाटा सन्सच्या बोर्ड बैठकीत चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीचा प्रस्ताव आला तेव्हा टाटा ट्रस्ट्सचे दोन्ही नॉमिनी डायरेक्टर आमनेसामने आले. नोएल टाटा यांनी प्रस्तावाच्या विरोधात, तर वेणू श्रीनिवासन यांनी बाजूने मतदान केले. म्हणजेच नॉमिनी डायरेक्टर्समध्ये 1-1 अशी बरोबरी झाली. बैठकीत उपस्थित एका डायरेक्टरच्या मते, इथेच कंपनी सचिवांनी कायदेशीर सल्ला मांडला की, बरोबरीच्या स्थितीत चेअरमन कास्टिंग म्हणजेच निर्णायक मत देऊ शकतात. यानंतर चंद्रशेखरन यांनी स्वतःच्याच पुनर्नियुक्तीच्या बाजूने निर्णायक मत दिले आणि प्रस्ताव पुढे गेला. नोएल यांनी विरोध करत माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांचा कायदेशीर सल्ला मांडला, पण टाटा ट्रस्ट्सचा दावा आहे की बोर्डाने तो स्वीकारला नाही.

## जिल्ह्यातील १३ ठिकाणी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन

✦ सचिन खंडारे

**बुलढाणा :** जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवक-युवतींना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' अंतर्गत एकाच दिवशी तब्बल १३ ठिकाणी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. हे मेळावे २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत पार पडणार आहेत.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा यांच्या वतीने या भव्य मेळाव्यांचे नियोजन करण्यात आले आहे. विविध आस्थापना आणि कंपन्यांमधील रिक्त पदांवर स्थानिक तरुणांना थेट रोजगाराची संधी मिळावी, हा यामागील मुख्य उद्देश आहे. मेळाव्याची प्रमुख वैशिष्ट्ये थेट मुलाखत: शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यानुसार उमेदवारांना नामांकित आस्थापनांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळेल. •विनामूल्य सॉफ्ट स्किल प्रशिक्षण: उमेदवारांना मुलाखतीची तयारी आणि रिझ्युमे (Resume) कसा बनवावा, याचे मार्गदर्शन करण्यासाठी २१ ते २४ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक तालुक्यातील शासकीय आयटीआय (ITI) येथे मोफत प्रशिक्षण आयोजित केले आहे. जिल्ह्यातील १३ ठिकाणे : पुंडलीक महाराज महाविद्यालय नांदुरा, KBJ ITI बोराखेडी मोताळा, राजमाता पॅरामेडिकल कॉलेज सिंदखेड राजा, मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा, श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली, एमईएस कला आणि वाणिज्य महाविद्यालय मेहकर,भगवान बाबा महाविद्यालय लोणार, जनता कला वाणिज्य महाविद्यालय मलकापूर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय जळगाव जामोद, शासकीय पॉलिटेक्निक खामगाव, सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस खामगाव, सरस्वती कॉलेज शेगाव, श्री व्यंकटेश कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय देऊळगाव राजा.

## गणेशोत्सवानिमित्त बुलडाणा डाक विभागातर्फे २१ सप्टेंबरला "गणपती नाईट कॅम्प

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे


बुलढाणा : गणेशोत्सवाच्या आनंदी वातावरणात नागरिकांना डाक विभागाच्या विविध बचत, विमा आणि टपाल सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी बुलडाणा डाक विभागातर्फे येत्या २१ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष "गणपती नाईट कॅम्प"चे आयोजन करण्यात आले आहे. सणाच्या काळात नागरिकांपर्यंत थेट पोहोचून त्यांना डाक विभागाच्या आधुनिक व डिजिटल सुविधांची माहिती देणे आणि मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कॅम्पमधील प्रमुख सेवा आणि आकर्षणे : या नाईट कॅम्पमध्ये नागरिकांना एकाच छताखाली पुढील सेवा उपलब्ध असणार आहेत. टपाल व पार्सल सेवा: स्पीड पोस्ट, रजिस्टर्ड पोस्ट, पार्सल बुकिंग आणि आंतरराष्ट्रीय टपाल सेवा. विमा व बचत योजना: 'पीएलआय' (PLI), 'आरपीएलआय' (RPLI) विमा सेवा आणि पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक (POSB) खाती. आधार व इतर सेवा: काही नियुक्त केंद्रांवर आधार नोंदणी व दुरुस्ती संबंधित सुविधा. डिजिटल सुविधा: युपीआय (UPI) द्वारे विमा प्रीमियम भरण्याची सोय व डिजिटल बँकिंगचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक. कॅम्पच्या ठिकाणी डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांच्या शंकांचे निरसन करतील आणि आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करतील. कॅम्पचे नियोजन:- दिनांक: सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ वेळ: सायंकाळी ०७:३० ते रात्री ११:३० ठिकाणे:- श्री गणेश मित्र मंडळ, अंढेरा (ता. चिखली), वंदेमातरम गणेशोत्सव मंडळ, खामगाव या विशेष उपक्रमाचा लाभ सर्व नागरिक, कुटुंबे, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच छोट्या व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन बुलडाणा डाक विभागातर्फे करण्यात आले आहे.

# पाऊस कमी असल्यामुळे सिंदखेडराजा तालुक्यासह जिल्ह्यात वृक्षारोपण कार्यक्रम थंडावला ?

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंडारे



**बुलढाणा :** यावर्षी अल निनोचा प्रभाव असल्याचे शास्त्रज्ञाचे मत आहे आणि तसाही प्रभाव महाराष्ट्र भरात जाणवायला देखील लागलेला आहे '

अनेक हवामान तज्ञांनी पावसाबद्दल आपापले अंदाज वर्तवले परंतु सर्व अंदाज हवे तसे प्रभावी आणि तंतोतंत ठरले नाही यावर्षी पाऊस अतिशय कमी प्रमाणामध्ये बुलढाणा जिल्ह्यात पडला आहे विशेषता : सिंदखेडराजा तालुक्यामध्ये पावसाचे प्रमाण खूप कमी आहे ,आणि या कमी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांना याचा फटका बसलेला आहे ' कमी पावसाचा परिणाम जाणू लागलेला आहे खरीप हंगामातील कापूस सोयाबीन तूर व इतर पिके ७०% टक्के हातातून गेलेली आहे ' त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची तीव्र स्वरूपाची टंचाई सुद्धा येणाऱ्या काही दिवसांमध्ये जाणवेलच ' त्याचबरोबर महाराष्ट्र सरकार मोठ्या प्रमाणात मध्ये पावसाळ्यामध्ये वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेत असतात , सुधीर मुनगुंटीवार हे वनमंत्री असताना मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रामध्ये वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला होता ' याला चांगला प्रतिसाद सुद्धा मिळाला होता शाळा महाविद्यालय शासकीय निम शासकीय कार्यालय ग्रामपंचायत कार्यालय पंचायत समिती तहसील सर्व ठिकाणी वृक्ष लागवड कार्यक्रम मोठ्या प्रमाणात सुरू होते ' मात्र यावर्षी पावसाळा कमी असल्यामुळे आणि पाऊस नसल्यामुळे वृक्ष लागवडीचा कार्यक्रम बंद असल्यासारखेच आहे , सिंदखेडराजा येथील वैष्णव गड परिसरामध्ये असलेल्या सामाजिक वनीकरण प्रादेशिक विभाग सिंदखेडराजा येथील नर्सरी मध्ये विविध प्रकारचे जवळपास ३० हजारापेक्षा जास्त झाडे आहेत ' पावसाळ्यामध्ये सदर रोपवाटिकेतून अनेक शिक्षण संस्थेमधील शिक्षक अनेक शाळा खाजगी बँके वाले ग्रामपंचायत वृक्ष लागवडी करता झाडे घेऊन जात होते ' मात्र या वर्षीची परिस्थिती वेगळी असून पाऊसच नाही तर झाडे कुठे लावावी असा प्रश्न निर्माण झाल्यामुळे सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिकेमधून वृक्ष लागवडी करता कोणीही झाडे नेलेली नाहीत ' किंवा झाडे दिलीही नाही ' कारण पाऊस पाहिजे तसा पडलेला नसून सतत पाऊस न पडल्यामुळे सुद्धा वृक्ष लागवडीचा उत्साह नागरिकांमध्ये कमी दिसून येत आहे ' त्यामुळे पावसामुळे सुद्धा वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मंदावला आहे हे मात्र खरे आहे '